नदीवरचा पूल



लेखिका: अनिता लोबल



नदीवरचा पूल

लेखिका

अनिता लोबल



मराठी अनुवादः सुशील मेन्सन



नदीकाठावर वसलेल्या एका छोट्याशा गावात *स्वेन* नावाचा एक माणूस राहात होता.





स्वेन वर-खाली उचलल्या जाणाऱ्या एका यांत्रिक पुलाचा पहारेकरी होता. त्याला त्याचे काम आवडत असे. तो दररोज पूल धुऊन स्वच्छ करत असे आणि त्याच्या यंत्रांना तेलपाणी करत असे.

बोट पुलाजवळ आली की त्यांना पुलाखालून जाऊ देण्यासाठी तो यंत्र चालवून पूल वर उचलत असे.




गावातील लोक त्या पुलाचा पूरेपूर वापर करत. पुलाची उत्तम देखभाल करणाऱ्या स्वेनचा ते आदर करत.

उन्हाळ्याच्या दिवसांत नदीच्या दोन्ही काठांवरील लोक एकमेकांना भेटत. सगळे आपुलकीने स्वेनला अभिवादन करत, “नमस्कार, स्वेन!”




हिवाळ्यात स्वेन शेकोटी पटवत असे

आणि सर्वांना चॉकलेट वाटत असे.



एकदा एक मोठे जहाज नदीत आले.


मुले ओरडू लागली, “स्वेन, ते बघ!
“राजा येतोय! लवकर पूल वर उचल.”





पण स्वेन पूल उचलत असतानाच राजा रागाने ओरडू लागला, “हा पूल कशाला बांधला इथे! किती गैरसोय होतेय माझी!”

“चला, चला, घाई करा,” राजा पाय आपटत रागारागात बोलू लागला, “मला भोजनासाठी उशीर होतोय.”



अचानक राजाच्या संतापाचा कडेलोट झाला.

तो ओरडला, “फायर!”


त्वरित सैनिकांना तोफ डागली.



तोफेच्या गोळ्यामुळे पूल उडून त्याचे तुकडे-तुकडे केले.



कित्येक महिने नदीच्या दोन काठांवरील लोक पूर्वीसारखे आपल्या परिचितांना भेटू शकले नाहीत. पुलाशिवाय एकमेकांकडे जाणे सोपे नव्हते.



मग स्वेनने एक नाव बनवली. दिवसभर तो लोकांना एका काठावरून दुसऱ्या काठावर नेऊ लागला. लोक म्हणत, “पूल असताना किती सहज भेटायचो आम्ही! नावेनं जाणं जरा अवघडच वाटतं.”





एके रात्री स्वेनला नदीच्या दुसऱ्या काठावरून घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू आला. राजा एका कार्यक्रमावरून घरी परतत होता.

पण रात्र काळोखी होती. राजाच्या रथाचा गाडीवान थकला होता. कुणी, “थांब!” म्हणून सावध करण्याअगोदरच त्याने रथ तसाच पुढे नेला. राजाचा रथ धाडकन नदीच्या पाण्यात पडला.



लोकांना वाचवायला स्वेन पुढे धावला.


त्याने राजाला बोटीत सुखरूप बसवले. राजा पुटपुटला, “इथे प्रवास करणं धोक्याचं आहे. खरंतर इथे एखादा पूल असायला हवा होता!”






पण घरात गेल्यावर राजाने स्वेनला ओळखले. नदीवर पूल का नाही, याचे कारण त्याच्या लक्षात आले. “ही सगळी माझी चूक आहे,” राजा खिन्नपणे म्हणाला. मग स्वेनने सर्वांना गरम चॉकलेट पेय आणि दालचिनीचा केक खायला दिले. खाऊनपिऊन सगळे ताजेतवाने झाले. अचानक राजाला एक कल्पना सुचली.

“आमचा शाही बांधकाम तज्ज्ञ या नदीवर पूल बांधून देईल,” राजा म्हणाला. “व्वा! यामुळे काठावरच्या लोकांना प्रवास करणं पुन्हा पहिल्यासारखं सहजसोपं होईल,” स्वेन खुश होत म्हणाला. त्याने राजाला आणखी एक कप गरम चॉकलेट पेय दिले.



पुढच्याच दिवशी पुलाचे काम सुरू झाले.
"पूल खूप उंचावर असेल. त्यामुळे बोटी त्याच्या खालून जाताना पूल वर उचलावा लागणार नाही," राजा म्हणाला.



"हे तर खूपच सोयीचं झालं," स्वेन आनंदून म्हणाला, कदाचित यामुळे पूल दीर्घकाळ टिकू शकेल, असे त्याला वाटले.



नवीन पूल बांधून झाला. नदीच्या दोन्ही काठांवरचे लोक हा प्रसंग साजरा करण्यासाठी पुलावर आले.

त्यांनी फुले उधळली आणि राजाला धन्यवाद दिले. त्यांनी परिचितांची गळाभेट घेतली आणि सकाळ होईपर्यंत एकत्र नाच केला.



स्वेन नवीन पुलाची देखभाल आवडीने करू लागला. तो दररोज साफसफाई करून पूल चकचकीत करू लागला. सूर्यास्तानंतर तो पुलाच्या दोन्ही टोकांवर दिव्याचे कंदील लावू लागला. त्यामुळे प्रवाशांना काळोखात पूल सापडायला आणि त्यावरून प्रवास करायला सोयीचे होऊ लागले.

समाप्त